डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

रासेयो/२०१९–२०/१२४ दि. ०९/०६/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालये व परिसंस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय : स्वच्छ वारी–स्वस्थ वारी–निर्मल वारी–हरित वारी अभियान व आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाकरिता रासेयो स्वयंसेवकांची नावनोंदणी करण्याबाबत**

महोदय/महोदया,

दिनांक २२ जून ते १५ जुलै २०१९ या दरम्यान दोन्ही वारीमार्गावर किमान २२ हजार विद्यार्थी स्वच्छ वारी–स्वस्थ वारी–निर्मल वारी–हरित वारी अभियानासाठी आणणे आणि वारीमार्गावरील संपूर्ण स्वच्छता, ५० लाख पानाच्या पत्रावळ्यांचे वाटप, ७५० टन ओला कचरा व निर्माल्यांचे संकलन, ३५० टन सेंद्रिय खतनिर्मिती, ३५ लाख लिटर पाण्याची बचत, २ लाख वारकऱ्यांची आरोग्य शिबिरातून सेवसुश्रुषा व साधनांचे वाटप, २ लाख वारकरी व गावकऱ्यांचे प्रबोधन, २० हजार कडुनिंब रोपांची वारीमार्गावर लागवड व संगोपन या स्तरावर हे अभियान यशस्वी करणे असे उद्दिष्ट विद्यापीठ रासेयो विभागाने निर्धारित केले आहे.

याशिवाय ४०० विद्यार्थी सलग २० दिवस पुणे ते पंढरपूर वारीमार्गावर स्वच्छ वारी–स्वस्थ वारी–निर्मल वारी–हरित वारी व आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतून ३०० रासेयो स्वयंसेवक, शिक्षक आणि महाराष्ट्रातील विद्यापीठांमधून सुमारे १०० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

सलग चालणाऱ्या ४०० विद्यार्थ्यांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील **राष्ट्रीय सेवा योजनेतील ५ विद्यार्थी स्वयंसेवक व ५ विद्यार्थिनी स्वयंसेवक आणि संघनायक** म्हणून इच्छूक शिक्षकांची नावे व मोबाईल नंबर इत्यादी तपशील **राष्ट्रीय सेवा योजना** कार्यालयाला मेलद्वारे **दि. १३ जून २०१९** पर्यंत कळवावा आणि पुणे जिल्ह्यातील सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी २ दिवसांसाठी सहभागी होणारे विद्यार्थी आणि सलग २० दिवस सहभागी होणारे विद्यार्थी यांची स्वतंत्र यादी भिमाशंकर येथील कार्यशाळेत जमा करण्यास निर्देशित करावे. कळावे ही विनंती.

टिप : सहभागी विद्यार्थी स्वयंसेवक व प्राध्यापकांची नावे (खालीलप्रमाणे)
nss_student_list@pun.unipune.ac.in
या मेल आयडीवर पाठविण्यात यावी, मेलचा विषय NSS Vari-2019 असा असावा.

| अ.क्र. | स्वयंसेवक नाव | महाविद्यालयाचे नाव | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना